# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यात महात्मा फुले कृषी सन्मान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कर्ज माफी, प्रोत्साहन भत्ता मिळणेबाबत

**(१) ५३ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.हेमंत पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले कृषी सन्मान योजनेच्या माध्यमातून ३० जूनपूर्वी कर्जाची पूर्ण परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारी निकषानुसार प्रोत्साहन अनुदान देण्यात येत असून सन २०१७ मध्ये तत्कालीन शासनाने "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना" अंतर्गत शेतकऱ्यांचे दीड लाखापर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर दीड लाखाच्या वरच्या कर्जास एकरकमी परतफेड योजनेनुसार शेतकऱ्यांनी दीड लाखाच्या वरचे कर्ज भरल्यास त्यानुसार लगेच दीड लाख रुपये शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात येणार असून सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या दोन वर्षांत नियमीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २५ हजार रुपये अनुदान देण्याचे घोषित केले होते, त्यानुसार ५०.६० लाख शेतकरी पात्र ठरले असून गेल्या ८ वर्षात २८.८८ लाख शेतकऱ्यांना १३ हजार ७०५ कोटींची कर्जमाफी देण्यात आली असून एकरकमी परतफेड योजनेत ४.२७ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळाला असून मात्र अद्यापही ६.५६ लाख शेतकरी अजूनही ५,९७५ कोटींच्या कर्जमाफीच्या लाभापासून अद्याप वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना महात्मा फुले कर्ज माफी योजनेंतर्गत कर्ज मुक्ती योजनेचा लाभ मिळाला नसल्याने नियमित कर्जदार शेतकरी साडेचार वर्षांपासून अनुदानापासून वंचित असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्ता आणि कर्जमाफीवरील रक्कम दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत देण्यात येईल असे मा.कृषी मंत्री यांनी विधानसभागृहात घोषित केले परंतु त्यानंतर रक्कम दिवाळीपर्यंत (२०२३) देण्यात येईल असेही घोषित केले होते तथापि, शेतकऱ्यांना ही रक्कम अद्याप

मिळाली नाही तसेच सन २०१९ साली तत्कालीन सरकारने महात्मा जोतिबा फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत २ लाखाच्या पर्यंत कर्जमाफी जाहीर केलेले होती त्यातील ३५.२० लाख शेतकऱ्यांपैकी ३२.९० लाख शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण केले आहे त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे, परंतु आधार प्रमाणीकरण न झालेले सुमारे ४९ हजार शेतकरी अजूनही कर्जमाफी पासून वंचित आहेत. खेड तालुक्यातील आंजणी (आयनी) गावातील अनेक शेतकऱ्यांनी आयनी-मेटे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीमधून आंबा पीक कर्ज घेतले होते, त्याची वेळेत परतफेड केली. मात्र, या गावातील दोन ते तीन शेतकरी वगळता इतर शेतकऱ्यांना सन २०१७-१८, सन २०१९-२० आणि आतापर्यंतच्या वर्षांचे प्रोत्साहन अनुदान मिळालेले नसल्याने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमाफी योजना व महात्मा फुले कर्जमुक्ती योजना या दोन्ही कर्जमाफीसाठी बरेच शेतकरी पात्र असूनसूध्दा ते कर्जमाफीपासून वंचित असल्याने सदरहू शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २२ जुलै,२०२४ रोजी निवेदन देऊन कर्जमाफीपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन्ही कर्जमाफी योजनेत सहभागी शेतकऱ्यांनी शासनाच्या सर्व अटींची पूर्तता केलेली आहे. तसेच शासनाने सरकारने आर्थिक तरतूद केलेली आहे मात्र योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या महा ऑनलाईन व महाआयटी या कंपन्यामधील तांत्रिक अडचणीमुळे गत ८ वर्षापासून दोन्ही कर्जमुक्ती योजनेतील एकूण ७ लाख पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून अजुनही वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागणीनुसार सदरहू शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याबाबत तसेच कर्जमाफीपासून गेल्या ८ वर्षापासून वचित असलेल्या शेतकर्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१०-०७-२०२५) :** (१) होय.

(२) नाही.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ या योजनेतंर्गत सांगली जिल्ह्यामधील एकूण ८८,६४७ कर्जखाती संगणकीय पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. त्यापैकी ८३,२२८ कर्जखात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला होता.विशिष्ट क्रमांक देण्यात आलेल्या कर्जखात्यांपैकी ८२,६८४ इतक्या खातेदारांनी आधार प्रमाणीकरण केलेले आहे तर ५४४ इतक्या खातेदारांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. आधार प्रमाणीकरण केलेल्या खात्यांपैकी ८१,६१९ इतक्या खातेदारांना रुपये ४८२.३६ कोटी इतकी रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे. पोर्टलवरील आकडेवारीनुसार आधार प्रमाणीकरण केलेल्या खातेदारांपैकी अद्याप १,०६५ इतक्या खात्यांना कर्जमाफीची रक्कम मिळालेली नाही. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १५ खात्यांची कर्जमाफीची रक्कम Short Claim व Excess Claim चे कारणास्तव अदा करता आलेली नाही.

(३) होय,

ॲड. निरंजन वसंत डावखरे, मा.विधानपरिषद सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना उद्देशुन दिनांक

२२/०७/२०२४ च्या पत्राव्दारे निवेदन दिले आहे.
(४) अंशत: खरे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत लाभास पात्र असलेल्या ५०.६० लाख शेतकऱ्यांपैकी ४४.०४ लाख (८७%) शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित पात्र ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत पात्र असलेल्या ३२.४२ लाख शेतकऱ्यांपैकी ३२.२७ लाख (९९.५३%) शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे.
(५) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ या योजनेतंर्गत लाभास पात्र असलेल्या परंतु लाभ प्रदान न केलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०६/२०२४ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार या योजनेंतर्गत लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांची यादी संबंधित बँकांकडून प्राप्त करुन घेण्याबाबतची व यादीचे संकलन करण्याची कार्यवाही सहकार आयुक्तलयाच्या स्तरावर सुरु आहे. सद्य:स्थितीत सहकार आयुक्त कार्यालयाकडे १८ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची व २ ग्रामिण बँकांची यादी प्राप्त झाली आहे. अन्य बँकांकडे यासंदर्भात पाठपुरावा सुरु आहे.
महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ या योजनेंतर्गत कर्जमाफीचा लाभ हस्तांतरण अयशस्वी ठरलेली ४,११३ कर्जखाती व कमी अधिक प्रमाणात लाभ प्रदान झालेली २२० कर्जखाती याप्रमाणे एकूण ४,३३३ कर्जखात्यांना लाभ देणे बाकी आहे. सदर कर्जखात्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यासंदर्भातील कार्यवाही महा-आयटी मार्फत सुरु असून यासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक व थेअरी शिक्षकांना समकक्ष वेतनश्रेणी देण्याबाबत

**(२) ३४३ (२४-०४-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येणाऱ्या एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रमातील समान कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या तसेच समान शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) या पदांना याच व्यवसाय अभ्यासक्रमातील कार्यरत पूर्णवेळ शिक्षक (थेअरी) यांच्यासारखे समकक्ष वेतनश्रेणी (ग्रेडवेतन ४६००/-) मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येणाऱ्या एचएससी व्होकेशनल अभ्यासक्रमातील समान कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडणाऱ्या तसेच समान शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पूर्णवेळ शिक्षक (प्रात्यक्षिक) या पदांना याच व्यवसाय अभ्यासक्रमातील कार्यरत पूर्णवेळ शिक्षक (थेअरी) यांच्यासारखे समकक्ष वेतनश्रेणी (ग्रेडवेतन ४६००/-) देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०९-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समग्र शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित वेतनश्रेणीत रुपांतरीत करणेबाबत

**(३) ७२४ (२४-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांची पदे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करताना जाहिरात देणे, लेखी व तोंडी परीक्षा आयोजित करणे इत्यादी निवड प्रक्रियांचा अवलंब केला होता काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परीषद, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असून परिषदेस खाजगी संस्था समजण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद खाजगी संस्था समजून अनुदानित माध्यमिक शाळांतील कर्मचाऱ्यांप्रमाणे तेथील सर्व कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी आणि शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-०७-२०२५) :** (१) व (२) समग्र शिक्षा या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी यापुर्वीच्या सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण योजना एकत्रित करून सन २०१८-१९ पासून समग्र शिक्षा योजना राबविली जात आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यकारी समितीच्या ६५ व्या बैठकीतील ठरावानुसार सुधारीत आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली, १९९४ अन्वये या योजनेसाठी करार पध्दतीने सहा महिन्यांच्या कालखंडानंतर एक दिवसाचा खंड देऊन नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.
(३) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई ही स्वायत्त संस्था असून संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.
(४) समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक ०४/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील कामगार कायद्यातील कामगार या व्याख्येत बदल करण्याच्या होत असलेल्या मागणीबाबत

**(४) ८२१ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयटी संघटनांकडून औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (Industrial Dispute Act) या कामगार कायद्यातील कामगार या व्याख्येत बदल करण्याची मागणी सातत्याने करण्यत येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायद्यात बदल करण्याचा अधिकार हा केंद्र शासनाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आयटी कामगारांच्या मागणीनुसार या कायद्यात बदल करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे विनंती तथा मागणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. आकाश फुंडकर (१६-०७-२०२५) :** (१) आयटी संघटनाकडून औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (Industrial Dispute Act, १९४७) या कामगार कायद्यातील कामगार या व्याख्येत बदल करण्याबाबतचे निवेदन/मागणी कामगार विभागास प्राप्त झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोदवड (जि.जळगाव) येथील गट विकास अधिकारी यांच्या कामकाजाची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत

**(५) ९०५ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि.जळगाव) येथील गट विकास अधिकारी हे पदाचा दुरुपयोग करून मनमानी कारभार करत असल्याने याबाबत चौकशी करून कठोर कारवाई करण्याकरीता विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे दिनांक २० मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान पत्र व्यवहार केलेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने सदर दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१४-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर यांच्याकडे दिनांक ०५/१२/२०२३ ते दिनांक १०/०९/२०२४ पर्यंत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बोधवड या पदाचा अतिरीक्त कार्यभार होता.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांनी द्विसदस्यीय समितीची नेमणूक करून चौकशी केली आहे. या समितीचा चौकशी अहवाल व त्यातील शिफारस विचारात घेऊन दिनांक १०/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बँक मित्रांना बँकिंग सेवेत सामावून घेणेबाबत

**(६) ९८३ (२४-०४-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागात बँकिंग सुविधा घरोघरी देण्याच्यादृष्टीने राष्ट्रीयकृत व प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या माध्यमातून बँकेकडून कमिशन तत्वावर नियुक्त केलेले बँक मित्र व बँक सखी यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांना ठराविक स्वरूपात मानधन देण्यात येत होते परंतु सध्या हे मानधन बंद करण्यात येऊन त्यांना कमिशन दिले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागात बँकांकडून मुद्रा, पीक कर्ज, अन्य योजनेचे कर्ज वितरण या बँक मित्रांच्या माध्यमातून करण्यात येत असून कोरोना काळातही बँक मित्रांनी बँकिग जबाबदारी पार पाडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बँक मित्रांनी पार पाडलेली जबाबदारी लक्षात घेता त्यांना बँकिंग सेवेत सामावुन घेण्याबाबतचा निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१०-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही,
राज्यस्तरीय बँकर्स समितीस बँकांकडून प्राप्त माहितीनुसार कुठल्याही प्रकारचे ठराविक स्वरुपातील मानधन बँक मित्र यांना दिले जात नाही. ग्रामिण भागात ग्राहकांना सुविधा घरपोच देण्याच्या दृष्टीने बँकिंग करस्पॉडंट व्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे. कॉर्पोरेट एजंट व बँक यांच्या माध्यमातुन बँक मित्र नियुक्त केले जाते. त्यांच्याव्दारे विविध बँकिंग सेवा जसे पैशाची रोख उलाढाल, खाते उघडणे इत्यादी सेवा दिल्या जातात. या कामाच्या मोबदल्यात बँक मित्रांना बँका कॉर्पोरेट एजंटव्दारे कमिशन देतात.
(२) अंशत: खरे आहे,
ग्रामिण भागात बँकांकडून मुद्रा, पीक कर्ज व अन्य योजनांचे कर्ज वितरण बँकांच्या शाखामार्फत होते. कोरोना काळात बँक मित्र यांचे कार्य मयादित राहिले. त्यांनी ठराविक वित्तीय सेवा सुरु ठेवल्या व नवीन खाते उघडण्यास मदत केली.
(३) बँक मित्रांना बँकिंग सेवेत सामावुन घेण्याबाबत कोणतीही कार्यवाही शासन स्तरावर सुरु नाही अथवा असा निर्णय घेण्याचे शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मधील गैरव्यवहार व अनियमिततेची चौकशी पारदर्शकपणे होणेसाठी संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमणेबाबत

**(७) १२४८ (२४-०४-२०२५) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक २१३६९ ला दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली. यांचेकडे सन २०१५ ते २०२१ या कालावधीतील संचालक मंडळाने केलेल्या कामकाजाबाबत वेळोवेळी तक्रारी दाखल झाल्यानंतर मा.सहकार आयुक्त व निबंधक यांनी ५ अधिकाऱ्यांची समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने चौकशी करुन त्यांचा अहवाल दिनांक १६ जून,२०२३ रोजी मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केला असून सदर अहवालानुसार बँकेच्या कामकाजात अनियमितता करुन बोगस कर्ज वाटप करुन अपहार केला असल्याचे निदर्शनास आले असून प्रशासकीय अहवालानुसार उघड झालेला अपहार गैरव्यवहार व अनियमितता ही कलम ८३ अन्वये झालेल्या चौकशीमध्ये सक्षमपणे मांडलेली नाही असे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या केलेल्या अपहाराबाबत सखोल चौकशी सहकार खात्याकडून व्हावी, व विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमावा, विद्यमान तसेच मागील संचालक मंडळावर गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करून त्यांची वसुली करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी करुन अनेक वेळा आंदोलनाचा पवित्रा घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठेवीदारांच्या ठेवीस व त्यांच्या विश्वासास तडा जाण्याची शक्यता असल्याने सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेची चौकशी पारदर्शकपणे होणेसाठी सध्याचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१०-०७-२०२५) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे,

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली या बँकेमधील कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या दिनांक १७/०९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.डी.टी.छत्रीकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने केलेल्या चौकशीअंती बँकेच्या कामकाजामध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, बँकेने नाबार्डच्या मार्गदर्शक सूचना, सहकार कायदा व बँकेचे पोटनियम यांचे उल्लंघन करुन असुरक्षित कर्जवाटप केल्याचे दिनांक १६/०६/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालामध्ये निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ अन्वये करण्यात आलेली चौकशी संस्थेच्या रचना व कार्यपध्दतीबाबत प्रशासकीय चौकशी असल्याने, सदर चौकशीमध्ये अपहार इ. बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही.

(३) होय.

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील अपहार-गैरव्यवहार प्रकरणी संचालक मंडळ

बरखास्त करुन प्रशासक नियुक्ती करण्यासंदर्भात मा.श्री.सदाभाऊ खोत, विधानपरिषद सदस्य व मा.श्री.गोपिचंद पडळकर, विधानसभा सदस्य यांचे अनुक्रमे दिनांक २१/०१/२०२५ व दिनांक २२/०१/२०२५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली या बँकेमधील कामकाजामध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालातील मुद्दयांच्या आधारे बँकेच्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी दिनांक ०३/०४/२०२४ रोजीच्या आदेशान्वये कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर आदेशाविरुध्द सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने शासनाकडे अपिल दाखल केले आहे. सदर अपिलावर दिनांक ३/०७/२०२४ रोजी सुनावणी होऊन, कलम ८८ अन्वये चौकशी आदेशाबाबत पुढील सुनावणीपर्यंत "जैसे थे" परिस्थिती ठेवणेचे आदेश तत्कालीन मंत्री, सहकार यांनी दिले होते. सद्य:स्थितीत सदर अपिलाची शासन स्तरावर दिनांक ०४/०६/२०२५ व १५/०६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य परिवहन कार्यालय परिवहन आयुक्तांच्या पदात अनियमितता झाल्याबाबत

**(८) १३९१ (२४-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या परिवहन आयुक्त कार्यालयात मागील तीन वर्षापासून सह परिवहन आयुक्त पद रिक्त असताना परिवहन आयुक्त यांनी दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२४ रोजी राज्य शासनाला पाठविलेल्या रिक्त पदांची नावे व दिनांक १२ नोव्हेंबरला पारित केलेल्या आदेशात अधिकाऱ्यांच्या नावामध्ये बदल केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सह परिवहन आयुक्त उमेदवारांना न्याय मिळविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-०७-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) परिवहन आयुक्त कार्यालयातील अपर परिवहन आयुक्त ते प्रादेशिक परिवहन अधिकारी या संवर्गातील एकूण मंजूर १७ पदांपैकी १४ पदे रिक्त असल्याने या रिक्त पदांचा कार्यभार सोपविण्याचा प्रस्ताव परिवहन आयुक्त यांनी दिनांक ०५/११/२०२४ च्या अर्धशासकीय पत्रान्वये शासनास सादर केला आहे. तसेच परिवहन आयुक्त कार्यालयातील अधिकारी वर्गाची कमतरता व कामकाजाची निकड विचारात घेऊन शासनस्तरावरुन आदेश निर्गमित होईपर्यंत परिवहन आयुक्त कार्यालयाचे आदेश दिनांक १२/११/२०२४ अन्वये परिवहन आयुक्त कार्यालयात रिक्त असलेल्या पदांचे अतिरिक्त कार्यभार मुंबई महानगर प्रदेशातील कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे सोपविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

## राज्यातील शबरी आदिवासी विकास महामंडळाकडून खावटी कर्ज उपलब्ध करून देणेबाबत

**(९) १५७० (१५-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शबरी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून मिळणारे खावटी कर्ज आणि त्याच्या अंतर्गत मिळणारे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा बंद करण्यात आल्यामुळे आदिवासी बांधव मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शबरी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून मिळणारे खावटी कर्ज व त्याअंतर्गत मिळणारे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०९-०७-२०२५) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य सहाकारी आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येणारी खावटी कर्ज योजना सद्य:स्थितीत कार्यान्वित नाही. तथापि, शासनाच्या मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी दिव्यांग, विधवा, निवृत्तीवेतन अनुदान योजना, मोफत अन्नधान्य वाटप योजना इत्यादी योजनांमधून अनुसूचित जमातीतील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथील अल्पसंखांक विकास शासकीय तंत्र निकेतन इमारतीचे भु-संपादनाबाबत

**(१०) १५७१ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील अल्पसंख्याक विकास शासकीय तंत्र निकेतन इमारतीचे बांधकाम शेतकऱ्यांच्या खाजगी क्षेत्रात करण्यात आले असून अतिक्रमित क्षेत्राचे भु-संपादन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या खाजगी क्षेत्रात करण्यात आलेल्या अल्पसंख्याक विकास शासकीय तंत्र निकेतन इमारतीचे भु-संपादनासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (१६-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मुक्ताईनगर, जि.जळगाव येथील शासकीय तंत्रनिकेतन संस्थेच्या इमारतीचे ८० टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरीत २० टक्के काम पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. शेतकऱ्यांच्या शेतात जायच्या रस्त्याकरीता तसेच इमारत बांधकामासाठी लागणारी जागा शेतकऱ्यांनी स्वतःहून बक्षीसपत्राद्वारे हस्तांतरीत करुन शासनास दिल्यामुळे उर्वरित बांधकामास सुरुवात

होणार आहे.
(३) लागू नाही.

---

## वढोदा (ता.मुक्ताईनगर जि.जळगाव) येथे १३२ केव्हीए सबस्टेशन उभारणीबाबत

**(११) १५८८ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे महापारेषण कंपनीचे १३२ केव्हीए सबस्टेशन उभारणी बाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०२५) :** (१) होय.
(२)१३२ केव्हीए वढोदा उच्चदाब उभारणीकरीता महावितरण जळगाव परिमंडळातर्फे तांत्रिक सुसाध्यता पडताळणी सुरु आहे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) लागू नाही.

---

## डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत निश्चित केलेल्या डोंगरी क्षेत्रातील गावाच्या नावात सुधारणा करण्याबाबत

**(१२) १७१८ (१७-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत सुधारित निकष व निकषांनुसार निश्चित केलेल्या डोंगरी क्षेत्रातील दिनांक १३ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये येवला (जि.नाशिक) तालुक्यातील नायगव्हाण ऐवजी नायगाव अशी चूक झाल्यामुळे शासन निर्णयात या गावाची सुधारणा करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी वा त्यासुमारास अपर मुख्य सचिव नियोजन विभाग यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डोंगरी क्षेत्रातील विकास कार्यक्रमांतर्गत सुधारित निकषाबाबत दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात येवला (जि.नाशिक) तालुक्यातील नायगव्हाण ऐवजी नायगाव या गावातील नावाच्या चुकीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.अजित पवार (१४-०७-२०२५) :** (१) होय.
(२) शासन निर्णय, दिनांक १३ मार्च, २०२४ अन्वये डोंगरी विभाग विकास कार्यक्रमांतर्गत नमूद करण्यात आलेल्या सर्व डोंगरी उपगट तालुक्यातील गावांच्या नावात काही तांत्रिक बाबी किंवा नामसाधर्म्यामुळे बदल किंवा दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावात वरील (१) येथील नमूद निवेदनातील गावाचा सुध्दा समावेश करण्यात आला आहे.

(३) लागू नाही.

---

## वेब सिरीजवर सेन्सॉर बोर्डाचा वचक ठेवण्याबाबत

**(१३) १७६८ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या अध्यक्षांनी वेब सिरीजवर सेन्सॉर बोर्डाचा वचक ठेवण्याची मागणी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या ओटीपी प्लॉट फॉर्मवर अनेक वेब सिरीज सुरू असून यात अंगप्रदर्शन, मानवी विकृतींचे जास्त प्रमाणात सादरीकरण होत असल्याने समाजावर याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वेब सिरीजवर सेन्सॉर बोर्डाचा वचक ठेवण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. आशिष शेलार (०७-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) OTT, You Tube वरील सादरीकरण हा विषय विभागाच्या अखत्यारितील रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, मुंबई यांच्या अधिपत्याखाली येत नाही. या विभागाकडून केवळ सार्वजनिक ठिकाणी (Stage वर प्रत्यक्षात सादर होणारे कार्यक्रम) सादर होणारे मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी (नाटक/एकांकिका/ लोकनाटय / तमाशा वर्ग / मेळे इत्यादी) नागरिकांनी तपासणीसाठी सादर केलेल्या लिखाणांचे (Script) पूर्वपरिक्षण करुन त्यांना कायमस्वरुपी योग्यता प्रमाणपत्र देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्पर्धा परीक्षेतील पेपर फुटी व इतर गैरप्रकाराच्या अनुषंगाने कायदा करण्याबाबत

**(१४) २२८९५ (१६-०७-२०२४) श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रतिवर्षी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटी व कॉपीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून राष्ट्रीय पातळीवर याविरोधात कोणताही कायदा नसून शासनाने स्पर्धा परीक्षेतील पेपरफुटी व इतर गैरप्रकारांच्या अनुषंगाने कडक कायदा करुन पदभरती करीता घेण्यात येणाऱ्या परीक्षांची कार्यपध्दती संरक्षित करुन शासनास उपाययोजना सुचवण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष श्री.किशोर राजे निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली माहे डिसेंबर, २०२३ मध्ये समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्पर्धा परीक्षांमध्ये पेपरफुटी व कॉपीच्या घटनांमुळे अनेक तरुणांचे नुकसान झाले

असल्यामुळे सदर समितीने पेपरफुटी व गैरप्रकारांवर कठोर कायदा करण्याच्या दृष्टीने आपला अहवाल शासनाला सादर केला असून शासन यातील सूचनांचा अभ्यास करून लवकरच कायदा करणार असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान, निदर्शनास आली आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने स्पर्धा परीक्षेतील पेपर फुटी व इतर गैरप्रकाराच्या अनुषंगाने कायदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-०७-२०२५) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्य शासनाच्या विविध पदभरतीकरीता घेण्यात येणाऱ्या परीक्षांची कार्यपध्दती पूर्णपणे संरक्षित करण्यासाठी "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४" कायदा करण्यात आला असून, सदर कायदा दिनांक १७/०९/२०२४ पासून अंमलात आला आहे.

---

## पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजनेंतर्गत नर्सिंग कोर्सचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ मिळत नसल्याबाबत

**(१५) २३२५४ (०८-०८-२०२४) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २२२३८ ला दिनांक १८ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंयोजनेंतर्गत आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात असून जिल्हा पातळीवरील वसतिगृहात प्रवेशित तांत्रिक शिक्षण उदा. नर्सिंग इत्यादीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुकास्तरावर असलेल्या वसतिगृहात प्रवेशित तांत्रिक कोर्सचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुकास्तरावरील वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना विविध कोर्सकरीता उपरोक्त योजनेंतर्गत लाभ मिळावा याकरीता शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०९-०७-२०२५) :** (१) व (२) स्वयंम योजना, शिष्यवृत्ती योजना व वसतिगृह प्रवेश या तीन स्वतंत्र योजना आहेत. वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेल्या आदिवासी समाजातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वयंम योजनेंतर्गत लाभ दिला जातो.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी कोळी समाजाच्या विविध समस्यांबाबत

**(१६) २३५३८ (१८-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोळी ही मुख्य जमात असून त्यातील महादेव कोळी, टोकरे कोळी, मल्हार कोळी, डोंगर कोळी, कोळी ढोर या जमातींना अनुसूचित जमातीचे (शेड्युल ट्राईबचे) आरक्षण लागू आहे, परंतु स्वातंत्र्यापूर्वी तत्कालीन ब्रिटिश शासनाच्या 'ब्रिटिशकालीन व निजामकालीन जनगणना नोंदी ह्या फक्त मुख्य जमातीच्याच कराव्या' या आदेशानुसार सध्या अनुसूचित जमातीमध्ये असलेल्या आदिवासी कोळी जमातीच्या नोंदी ह्या 'कोळी' अशा करण्यात आल्याने राज्यातील अनुसूचित जमाती पडताळणी समित्या वैधता प्रमाणपत्र व महसूल अधिकारी जात प्रमाणपत्र देताना संबधितांना 'सन १९५० पूर्वीचे पुरावे सादर न केल्याचे कारण' देवून नाकारत असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा विभागाच्या आणि या CP बेरार प्रांतातील (अमरावती महसूल विभाग), विदर्भ विभागाच्या आणि काही पश्चिम महाराष्ट्राच्या आदिवासी कोळी लोकांच्या नोंदी मुख्य जमात म्हणून असल्यामुळे त्याना अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण आहे परंतु स्वातंत्र्यानंतर संविधानामध्ये कोळी महादेव, मल्हार कोळी, ढोर कोळी, टोकरे कोळी अशी नोंद असल्यामुळे वैधता प्रमाणपत्र आणि जात प्रमाणपत्र नाकारले जाते हे खर आहे काय

(३) असल्यास, शासनाने दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी समिती किंवा आयोग स्थापन करून सदरहू प्रकरणी अभ्यास करून विस्तृत क्षेत्रातील आदिवासी कोळी लोकांना न्याय देण्याबाबत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०२-०७-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

"महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व सदर अधिनियम अंतर्गत पारीत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३", दिनांक ०४/०६/२००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणीची कार्यवाही करण्यात येते. सदर अधिनियमातील कलम ८ नुसार आपण त्या जातीचे, जमातीचे किंवा वर्गाचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर असते. सदर अधिनियमातील / नियमातील तरतुदी या सर्व अनुसूचित जमातींना लागू आहेत.

(३) मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २०/१०/२०२३ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती.

ब्रिटीशकालीन दस्तऐवज, कोळी समाजाच्या विविध नोंदीचा व त्याबाबतच्या वेळोवेळीच्या आदेशांचा तसेच मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त माजी न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी, त्यामध्ये कोळी समाजाचे प्रतिनिधी, इतर आदिवासी जमातीचे प्रतिनिधी तसेच तज्ञ व्यक्तींचा समावेश असावा सदर समितीने याबाबतचा अभ्यास करुन त्यांचा अहवाल शासनास सादर

करावा असा निर्णय बैठकीमध्ये घेण्यात आला. त्याअनुषंगाने आदिवासी जमातीच्या यादीमध्ये समाविष्ठ नसलेल्या इतर कोळी जातींचा समावेश हा विशेष मागास प्रवर्गामध्ये करण्यात आलेला असल्याने उपरोक्त समिती ही इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत गठीत करण्यास मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता प्राप्त झाली असून पुढील कार्यवाही इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करणेबाबत

**(१७) २३५६४ (२०-०७-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना पर्यटनासाठी तीर्थस्थळी जाण्याची संधी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधींनी केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यातील एक हजार लाभार्थी या योजनेत समाविष्ट झाले तर हजारो जेष्ठ नागरिकांना राज्यातील व देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांना भेटी देणे सोईचे होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना राबविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीवर शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२५-०४-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थदर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना राबविण्यास दिनांक १४ जुलै,२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. दिनांक ८ऑगस्ट,२०२४ च्या शासन निर्णयान्वये योजनेत सुधारणा करण्यात आली असून दिनांक १५/१०/२०२४ च्या शासन निर्णयान्वये या योजनेत नव्याने काही तीर्थस्थळांचा समावेश करण्यात आला आहे.या योजनेच्या निकषानुसार ज्येष्ठ नागरिकांना मोफत तीर्थदर्शन यात्रेचा लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन करण्याबाबत

**(१८) २३५७४ (२२-०७-२०२४) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व अनुदानित महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन पूर्ण झाले आहे काय,
(२) असल्यास, जिल्हानिहाय १००% अनुदानित महाविद्यालयांची संख्या व माहे मार्च, २०२४ अखेर नॅक मुल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केलेल्या महाविद्यालयांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,
(३) असल्यास, माहे मार्च, २०२४ अखेर नॅक मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण न केलेल्या महाविद्यालयांबाबत

शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१४-०७-२०२५) :** (१) नाही. सद्य:स्थितीत राज्यातील ११७७ अशासकीय अनुदानित महाविद्यालयापैंकी ११४२ महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली आहे.
(२) मार्च, २०२४ अखेर नॅक मुल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केलेल्या अनुदानित महाविद्यालयांची जिल्हानिहाय संख्या-

| अ.क्र. | विभाग | जिल्हा महाविद्यालयांची संख्या | नॅक मुल्यांकन केलेल्या महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|
| अमरावती विभाग | | | |
| १. | अमरावती | ५१ | ४९ |
| २. | यवतमाळ | ३१ | २७ |
| ३. | अकोला | २६ | २४ |
| ४. | बुलढाणा | २५ | २३ |
| ५. | वाशिम | १९ | १९ |
| | एकूण | १५२ | १४२ |
| छत्रपती संभाजीनगर विभाग | | | |
| १. | छत्रपती संभाजीनगर | ४० | ३६ |
| २. | जालना | १४ | १४ |
| ३. | धाराशीव | २१ | २० |
| ४. | बीड | ४० | ३९ |
| | एकूण | ११५ | १०९ |
| जळगाव विभाग | | | |
| १. | जळगाव | ४० | ४० |
| २. | नंदुरबार | १६ | १६ |
| ३. | धुळे | २७ | २७ |
| | एकूण | ८३ | ८३ |
| कोल्हापूर विभाग | | | |
| १. | कोल्हापूर | ५५ | ५५ |
| २. | सातारा | ३८ | ३८ |
| ३. | सांगली | ४० | ४० |
| | एकूण | १३३ | १३३ |
| मुंबई विभाग | | | |
| १. | मुंबई शहर | ९७ | ९४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मुंबई उपनगरे | ०३ | ०२ |
| | एकूण | १०० | ९५ |
| नागपूर विभाग | | | |
| १. | नागपूर | ६८ | ६६ |
| २. | भंडारा | २५ | २० |
| ३. | चंद्रपूर | ३८ | ३८ |
| ४. | गोंदिया | १६ | १३ |
| ५. | वर्धा | २३ | २३ |
| ६. | गडचिरोली | २५ | २२ |
| | एकूण | १९५ | १८० |
| नांदेड विभाग | | | |
| १. | नांदेड | ३३ | ३३ |
| २. | परभणी | १९ | १९ |
| ३. | हिंगोली | ०८ | ०८ |
| ४. | लातूर | ३७ | ३६ |
| | एकूण | ९७ | ९६ |
| पनवेल विभाग | | | |
| १. | पालघर | ०२ | ०२ |
| २. | रायगड | २५ | २५ |
| ३. | सिंधुदुर्ग | १० | १० |
| ४. | ठाणे | ४४ | ४४ |
| ५. | रत्नागिरी | १३ | १३ |
| | एकूण | ९४ | ९४ |
| पुणे विभाग | | | |
| १. | पुणे | ८२ | ८१ |
| २. | नाशिक | ४६ | ४६ |
| ३. | अहिल्यानगर | ४० | ४ |
| ४. | एकूण | १६८ | १६७ |
| सोलापूर विभाग | | | |
| १. | सोलापूर | ४० | ४० |
| | एकूण | ४० | ४० |
| | एकूण | ११७७ | ११४२ |

(३) संचालक, उच्च शिक्षण यांनी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि संबंधित महाविद्यालये/ संस्थांचे प्राचार्य यांना महाविद्यालयाचे नॅक करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना वेळोवेळी

दिल्या आहेत. नॅक मुल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्याबाबत विद्यापीठांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात कृषी विभागात डेटा ऑपरेटर पद भरण्याबाबत

**(१९) २३८४८ (०८-०८-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पीक विमा व किसान सन्मान योजना कृषी विभागातर्फे राबविली जात असून शेतकऱ्यांच्या पीक विम्याची माहिती कृषी आयुक्त व विमा कंपन्याना पाठविणे तसेच शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मानधन तत्त्वावर नियुक्त केलेल्या दोन्ही महत्वाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची मुदत दिनांक ३१ मार्च,२०२४ रोजी पासून संपल्यामुळे संपूर्ण कामकाज बंद पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किसान सन्मान योजनेसाठी माहे जून, २०२३ पासून कंत्राटी डेटा ऑपरेटरची मागणी करुनही मनुष्यबळ उपलब्ध होत नसल्याने सोलापूर जिल्ह्यातील पीक विमा व किसान सन्मान योजनेचे कामकाज संपूर्ण बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील कृषी विभागात आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०९-०५-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना व किसान सन्मान योजनेतील कंत्राटी मनुष्यबळाची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी संपल्यामुळे सद्य:स्थितीत कृषी आयुक्तालयातील उपलब्ध कर्मचारी यांचेकडून या योजनांचे कामकाज सुरु आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. किसनि-२०२३/प्र.क्र.१२८/११-अे, दिनांक १३/१२/२०२४ अन्वये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता आवश्यक असलेल्या ४११ मनुष्यबळाच्या सेवा बाहययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## सन २००४ ते २०१९ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांबाबत

**(२०) २४३९० (२९-११-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागामार्फत सन २००४ ते २०१९ या कालावधीमध्ये विविध योजनांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांबाबत गठीत करण्यात आलेल्या श्री.एम.जी.गायकवाड समितीने सादर केलेल्या अहवालावर करावयाच्या पुढील कार्यवाहीसाठी शासनास शिफारस करण्याकरीता आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २९/०९/२०१७ च्या शासननिर्णयान्वये श्री.पि.डी.करंदीकर भा.प्र.से (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय क्रमांक बि.यु.डी.-२०१९/ प्र.क्र.०३/ कार्यासन -६. दिनांक १८ डिसेंबर,२०१९ रोजीच्या शासननिर्णयान्वये सदर समितीच्या व्यवस्थापन खर्चासाठी एक कोटी रुपयांच्या निधीची तरतूदही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पि.डी.करंदीकर समितीने आजमितीपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०२-०७-२०२५) :** (१) होय,
(२) होय,
(३) न्या. गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाची छाननी करुन या अहवालाच्या अनुषंगाने संबधितांवर बजावयाच्या दोषारोपांची निश्चिती आणि शासनामार्फत पुढील कार्यवाही करण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरीता श्री.करंदीकर समिती गठीत केली आहे.

त्यानुषंगाने न्या. गायकवाड समिती अहवालाचे अवलोकन करुन करंदीकर समितीने अहवालाचे अ,ब,क,ड असे वर्गीकरण करुन दोषी अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द (FIR) / विभागीय चौकशी करण्याबाबत शिफारस केली होती. त्यानुसार शासनाने एकूण १४७ दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर १३९ प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करण्यात आले आहेत. तसेच ११२ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहेत. एकूण ११२ पैकी १०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे. अपर आयुक्त स्तरावर ३ व शासन स्तरावरील ९ असे एकूण १२ अधिकारी /कर्मचारी यांच्या विभागीय चौकशी सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.